**नियमित दिवाणी दावा क्रमांक १२/२०२२ मध्ये निशाणी क्र. १६ खालील आदेश**
**गुणवंत वि. संत नरहरी**
**दिनांक ०९ एप्रिल, २०२२**

सदर अर्ज वादीने प्रतिवादी क्र. ४ यांचे विरुध्द जैसे थे चा आदेश पारीत करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर दावा वादीने सक्तीचा मनाई हुकुम व प्रतिवादी क्र. ४ ने केलेले अतिक्रमण काढुन टाकण्यासाठी केलेला आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, वादीचा भुखंड क्रमांक १९ असुन त्याच्या उत्तर बाजुला प्रतिवादी क्र. ४ चा भुखंड क्र. २० आहे. प्रतिवादी क्र. ४ ने वादीच्या प्लॉट क्र. १९ मध्ये ४६० चौ.फुट एवढे अतिक्रमण करुन बांधकाम सुरु केले आहे. त्यामुळे सदर अतिक्रमण हटवुन वादीला त्याच्या ४६० चौ. फुट जागेचा ताबा देण्याची प्रार्थना मुळ दाव्यामध्ये करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त नि.क्र. ५ चा अर्ज दाखल करुन प्रतिवादी क्र. ४ ने अतिक्रमीत क्षेत्रावरील बांधकाम थांबवावे अशी विनंती नि.क्र. ५ च्या अर्जामध्ये केली. तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या अनुषंगाने प्रतिवादींना नोटिस सुध्दा पाठविण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्रतिवादी क्र. ४ दि. ०५.०४.२०२२ रोजी प्रकरणात हजर झाले. परंतु त्यांनी अद्यापपावेतो त्यांचा लेखी जबाब अथवा नि.क्र. ५ वरील जबाब प्रकरणात दाखल केला नाही.

२. अर्जाच्या अनुषंगाने वादीचे विद्वान वकील श्री आमले यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे एकंदरीत अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने एकंदरीत प्रतिवादी क्र. ४ यांच्या विरुध्दच मागण्या मागितल्या आहे. या ठिकाणी नमुद करणे आवश्यक आहे की, जैसे थे चा आदेश पारीत करण्याअगोदर वाद संपत्तीची आजची स्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे. वादीने वादपत्र नि.क्र. १ मध्ये भुखंड क्र. १९ व २० व अतिक्रमीत क्षेत्र दर्शविणारा कच्चा नकाशा दाखल केला आहे. त्यामध्ये अतिक्रमीत क्षेत्राचे क्षेत्रफळ ४६० चौ.फुट ''अ ब क ड'' मध्ये दर्शविले आहे. या व्यतिरिक्त वादीने दाखल केलेल्या खरेदी खताच्या प्रतीवरुन भुखंड क्र. १९ च्या उत्तरेला भुखंड क्र. २० दर्शविण्यात

आलेला आहे. तसेच वादीने प्रतिवादी क्र. ४ चे बांधकाम दर्शविण्याकरीता छायाचित्रसुध्दा पटलावर दाखल केले आहे. यावरुन वाद संपत्तीवरील आजची परिस्थीती स्पष्ट होते. प्रतिवादी क्र. ४ ला त्यांचा जबाब दाखल करण्याची संधी देण्यात आली होती. परंतु त्यांनी त्यांचा जबाब दाखल केलेला नाही. एकंदरीत दस्त व तथ्थे यावरुन प्रतिवादी क्र. ४ यांना दावा नकाशा मध्ये दर्शविलेल्या अतिक्रमीत क्षेत्र अ ब क ड वर पुढील बांधकाम न करता परिस्थीती जैसे थे ठेवण्याचा आदेश करण्याची आवश्यकता दिसुन येते आहे. सबब, पुढील आदेश पारीत करण्यात येते.

## आदेश

प्रतिवादी क्र. ४ यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी वादीचा भुखंड क्र. १९ च्या उत्तर दिशेला असलेल्या ४६० चौ.फुट क्षेत्रातील (वाद नकाशा मधील अ ब क ड ) वर पुढील बांधकाम न करता पुढील तारखेपर्यंत परिस्थीती जैसे थे ठेवावी.

**(ह.ना. पोले)**
**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर**
**कळमेश्वर**

**कळमेश्वर**
**दिनांक ०९/०४/२०२२**

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of the this PDF file order are same word to word, as per the original Order.

Name of the Stenographer :- R.S. Daware(Gr. III)